# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**

MCAER
कृषि परिषद

**ई-मेल** : edn_mcaer@rediffmail.com **संकेतस्थळ** : www.mcaer.org **दूरध्वनी (०२०) २५५२८६८८**


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/७८२३/८२/३७० दि. २५ जानेवारी,२०२४

## परिपत्रक

**विषयः- आचार्य पदवी प्रवेश प्रक्रिया २०२३-२४**
**पहिली प्रवेश वाटप फेरी व सुधारीत वेळापत्रकाबाबत.**

संदर्भः- या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण-१/२४२३/६५/२५१,दि.१७/०१/२०२४

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत आचार्य पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया दि.२०/१२/२०२३ पासून राबविण्यात येत आहे. नियोजित वेळापत्रकानुसार पहिल्या प्रवेश वाटप फेरीच्या यादीची प्रसिध्दी दि. १६/०१/२०२४ रोजी करण्यात येणार होती. मात्र तांत्रिक अडचणीमुळे सदर यादी प्रसिध्द होऊ शकली नाही.

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधित उमेदवार आणि कृषी विद्यापीठातील संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना कळविण्यात येते की, आचार्य पदवी प्रवेश प्रक्रिया २०२३-२४ अंतर्गत पहिल्या प्रवेश वाटप फेरीच्या वाटपाची प्रसिध्दी व त्यापुढील वेळापत्रक खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कार्यक्रम | अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १. | (i) पहिल्या प्रवेश वाटप फेरीच्या यादीची प्रसिध्दी | २६/०१/२०२४ |
| | (ii) रिपोर्टिंगचा कालावधी | २९/०१/२०२४ व ३०/०१/२०२४ (सायं. ५.३० पर्यंत) |
| २. | (i) दुसऱ्या प्रवेश वाटप फेरीच्या यादीची प्रसिध्दी. (रूपांतरासह) | ०५/०२/२०२४ (संध्याकाळनंतर) |
| | (ii) रिपोर्टिंगचा कालावधी | ०७/०२/२०२४ व ०८/०२/२०२४ (सायं. ५.३० पर्यंत) |
| ३. | विषयनिहाय व प्रवर्गनिहाय शेवटच्या प्रवेशित गुणांच्या तपशीलाची (last merit / cutt off) प्रसिध्दी | ०९/०२/२०२४ |
| ४. | तिसरी प्रवेश वाटप फेरी (सोबतच्या **परिशिष्टातील** कार्यपध्दतीनुसार) | १३/०२/२०२४ व १४/०२/२०२४ |
| ५. | वर्ग सुरु होण्याचा दिनांक | १३/०२/२०२४ |

**सोबत- परिशिष्ट**

**मा.महासंचालक यांच्या मान्यतेने**

**(हेमंत पाटील)**
**संचालक (शिक्षण)**

प्रतः-

१. कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी), महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

२. मे. विबास टेक्नोलॉजी , पुणे यांना सूचित करण्यात येते की, सर्व संबंधितांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.

३ मे.लर्निंग स्पायरल प्रा.लि. ३ अे, ऑकलँड प्लेस, पाचवा मजला, कलकत्ता ७०००१७ (पश्चिम बंगाल) यांना सूचित करण्यात येते की, उक्त परिपत्रकामध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे उमेदवारांच्या लॉगइनमध्ये योग्य ती सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी, तसेच सदर परिपत्रक प्रवेश प्रक्रियाविषयक संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावे आणि सर्व संबंधित उमेदवारांना भ्रमणध्वनी / ई-मेलद्वारे अवगत करण्यात यावे.

**कृषी परिषद कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण-१/७८२३/८२/३७०**
**दि. २५ जानेवारी,२०२४ सोबतचे परिशिष्ट**

## <u>तिसऱ्या प्रवेश वाटप फेरीची कार्यपध्दती</u>

तिसऱ्या प्रवेश वाटप फेरीपूर्वी राबविण्यात आलेल्या प्रवेश फे-यांद्वारे प्रवेश मिळालेल्या उमेदवारांनी नोंदणी न केल्याने अथवा इतर कारणाने जागा रिक्त असल्यास अशा रिक्त जागांसाठी दि.१३/०२/२०२४ व दि.१४/०२/२०२४ या कालावधीत संबंधित महाविद्यालयस्तरावर खालील कार्यपध्दतीने ऑनलाईन महाविद्यालयनिहाय प्रवेश वाटप फेरी राबविण्यात येईल.

यापूर्वी राबविण्यात आलेल्या प्रत्येक प्रवेश वाटप फेरीतील अंतिम गुणवत्ताविषयक प्रवर्गनिहाय (Categorywise Last Merit) तपशील व अद्ययावत रिक्त जागांचा प्रवर्गनिहाय तपशील मे. लर्निंग स्पायरल प्रा.लि., कलकत्ता यांच्याकडून www.mcaer.org व https://mcaeronline.in या संकेतस्थळावर दि. ०९ फेब्रुवारी,२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात येईल.

**राज्यस्तरीय / विद्यापीठस्तरीय गुणवत्ता यादीत समाविष्ट असलेले आणि चालू शैक्षणिक वर्षाच्या आचार्य पदवी प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेशित नसलेले (not admitted) उमेदवार ऑनलाईन महाविद्यालयनिहाय प्रवेश वाटप फेरीकरिता पात्र असतील.** अशा पात्र उमेदवारांनी तसेच संबंधित महाविद्यालयांनी खालील बाबी विचारात घ्याव्यात.

(१) संकेतस्थळावरील रिक्त जागांचा तपशील विचारात घेऊन उमेदवारांना ज्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे, त्या महाविद्यालयात दि.१३/०२/२०२४ व दि.१४/०२/२०२४ **या कालावधीत सकाळी १०.०० ते दुपारी १३.०० या कालावधीत** आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे व शुल्कासह उमेदवारांनी उपस्थित राहावे.

(२) संबंधित संस्था / महाविद्यालयाचे अधिष्ठाता / सहयोगी अधिष्ठाता यांनी स्वतः **सकाळी १०.०० ते १३.०० या वेळेत उपस्थित असलेल्या उमेदवारांची प्रवर्गनिहाय गुणवत्ता यादी तयार करून ती नोटीस बोर्डवर प्रसिध्द करावी.**

(३) वरीलप्रमाणे पात्र उमेदवारांचा गुणानुक्रमे विचार करून रिक्त जागांसाठी प्रवेश देण्यात यावेत. **आरक्षित प्रवर्गातील रिक्त जागांसाठी संबंधित प्रवर्गाच्या उमेदवारांनाच प्राधान्यक्रमाने प्रवेश देण्यात यावेत.** संबंधित आरक्षित प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध नसल्यास, शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र.मकृवि-२०१०/प्र.क्र.१५५/७अे, दि.२०/१०/२०११ मधील परिशिष्ट २ येथील कार्यपध्दतीनुसार अशा रिक्त जागांवर तिसऱ्या प्रवेश वाटप फेरीच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच **दि. १४ फेब्रुवारी,२०२४ रोजी** उपस्थित असलेल्या इतर उमेदवारांना गुणानुक्रमाने प्रवेश देण्यात यावेत. सदर शासन निर्णय कृषी परिषद व मे. लर्निंग स्पायरल प्रा.लि., कलकत्ता यांच्या

संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. **मात्र कोणत्याही परिस्थितीत आरक्षित जागांवर प्रवेश मिळाला नाही, अशी तक्रार आरक्षित प्रवर्गाच्या उमेदवारांकडून कोणत्याही परिस्थितीत येणार नाही, याची दक्षता संबंधित अधिष्ठाता / सहयोगी अधिष्ठाता यांनी घ्यावी.**

(४) उच्च गुणवत्ताधारक उमेदवार उशिरा हजर झाल्यास आणि त्यावेळी जागा रिक्त असल्यास, अशा **उच्च गुणवत्ताधारक उमेदवारास प्रथम प्राधान्याने प्रवेश देण्यात यावा.**

(५) योग्य त्या उमेदवाराची प्रवेशासाठी निवड निश्चित झाल्यास त्याप्रमाणे मे. लर्निंग स्पायरल प्रा.लि., कलकत्ता **यांच्या संकेतस्थळावर नोंदणी करून 'लॉग इन'द्वारे महाविद्यालयांनी संबंधित उमेदवारास प्रवेश द्यावा.** यासाठी संकेतस्थळावरील महाविद्यालयांच्या 'लॉग इन'मध्ये योग्य ती सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी 'मे. लर्निंग स्पायरल प्रा.लि., कलकत्ता' यांची असेल.

(६) दि.१३/०२/२०२४ व दि.१४/०२/२०२४ या कालावधीत दररोज सायंकाळी ४.३० पर्यंत वरील प्रवेश प्रक्रिया संबंधित महाविद्यालयस्तरावर करण्यात यावी.

**(७)** महाविद्यालयांनी दरदिवशी प्रवेश देण्यात आलेल्या प्रवेशांबाबतचा तपशील **संचालक (शिक्षण) व 'मे. लर्निंग स्पायरल प्रा.लि., कलकत्ता' यांच्याकडे सायंकाळी ५.०० वाजेपूर्वी ई-मेलद्वारे कळवावा.**

(८) तिसऱ्या प्रवेश वाटप फेरीद्वारे प्रवेश मिळालेल्या उमेदवारास त्याच्या 'लॉग इन'मध्ये प्रशासकीय कारणास्तव 'मे. लर्निंग स्पायरल प्रा.लि., कलकत्ता'ने तात्पुरते 'प्रवेश वाटप पत्र' उपलब्ध करून द्यावे.

(९) तिसऱ्या प्रवेश वाटप फेरीच्या कालावधीमध्ये उमेदवाराने प्रवेश रद्द केला असल्यास किंवा इतर कारणामुळे प्रवेश रद्द केल्यास, यामुळे रिक्त झालेली जागा त्याच दिवशी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी, मात्र त्याच दिवशी भरण्यात येऊ नये. अशी रिक्त जागा दुस-या दिवसापासून प्रवेशाकरिता उपलब्ध करून देण्यात यावी. (तिसऱ्या प्रवेश वाटप फेरीच्या शेवटच्या दिवशी रिक्त होणा-या जागांसंदर्भात ही बाब लागू नसेल.)